# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/02/2023 (शुक्रवार) दुपार

---

## नरखेड पोलीसांकडुन मोटर सायकल चोरांचा पर्दाफाश

पोलीस स्टेशन नरखेड नागपूर ग्रामीण येथील गुन्हे प्रकटीकरण पथक हे मागील काही दिवसा पासुन मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चोरीबाबत अज्ञात आरोपीचा शोध घेत असता मिळालेल्या माहीतीवरून मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे जेल बंद असलेले आरोपी क्र. १) प्रमोद उर्फ पिंटु केशवराव राऊत, वय ३४ वर्ष, रा. पेठबुधवार काटोल ता. काटोल जि. नागपूर ह.मु. पठार २) मयुर माधवराव युवनाते, वय २२ वर्ष, ३. अजय धुरेसिंग परतेती वय २५ वर्ष, रा. दोन्ही रा. उमरखेड ता. मोर्शि जि. अमरावती ४) विवेक सुधाकरराव भुजाडे, वय ३१ वर्ष, रा. हिवरखेड ता. मोर्शी जि. अमरावती यांचा ताबा घेवुन त्यांचेकडे पोलीस कोठडी दरम्यान कौशल्यपुर्ण तपास करून नरखेड तसेच ईतर पोलीस ठाणे हद्दीतून मागील दोन वर्षात चोरी झालेल्या मोटरसायकली आरोपीकडुन जप्त करण्यात आलेल्या असुन त्यामध्ये एकुण वेगवेगळया कंपनीच्या ०७ मोटरसायकली किंमती अंदाजे असा एकुण २,३४,०००/—रूपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात नरखेड गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आलेले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री. नागेश जाधव यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन नरखेड येथील ठाणेदार श्री. जयपालसिंग गिरासे, सहायक पोलीस निरीक्षक हरिश्चंद्र गावडे, पोलीस नायक कैलास उईके, पोलीस शिपाई राजकुमार सातुर, गौरव बखाल, कैलास टेकाडे यांनी पार पाडली.




## चोरी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील धर्मापूरी येथे दिनांक ०२/०२/२०२३ चे १५.३० वा. ते १५.४० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गं भा. शांताबाई मनोहर हटवार, वय ५५ वर्षे रा. चोखाळा ही सूरसंगम धर्मापूरी येथे दर्शनाकरीता गेली असता तेथे महाप्रसाद घेणे करीता रांगेमध्ये उभी असता यातील आरोपी नामे—१) आशा लहानूजी पात्रे, वय ४० वर्ष, २) सौ. रोशना राजू पात्रे, वय ४० वर्षे, दोन्ही रा. डोंगरगड बस स्टॉप जवळ (छत्तीसगड) महिलांनी फिर्यादिचे गळयातील सोन्याचे मंगळसूत्र किंमती अंदाजे ४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे महिला आरोपींविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. महिला आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ. टिकाराम जाधव ब .नं १३३१ मो. नं ८८३०९६५३४७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**